# आनंद सरिता



# आनंद सरिता

प्रथमावृत्ती १६-८-८७ गोकुळ अष्टमी

द्वितीयावृत्ती १४-१-८९ मकर संक्रांत

कवयित्री – श्रीमती आशालता वेलणकर

प्रकाशक – प्रबोध वेलणकर, अंबरनाथ

मुद्रण स्थळ – सुयोग मुद्रण, कुळगांव

मूल्य – रु. २-५०

जीवनाला योग्य ते वळण देऊन .
श्रीमद्भागवताद्वारे जनता
जनार्दनाची सेवा करण्यास ज्यांनी
उद्युक्त केले त्या ब्रह्मलीन प. पूज्य
सद्गुरू माऊली जिजी महाराज
उर्फ पू. भागिरथीबाई वैद्य, इंदोर
यांचे चरणी अर्पण

# मनोगत

आनंद सरिता कोठे झुळझुळ तर कोठे खळखळ वाहत जनसागरांत जाऊन मिळाली.

जागे अभावी असंख्य अभिप्राय छापणे अशक्य.

ज्यांनी लेखी अभिप्राय पाठविले त्यांची मी ऋणी आहे.

द्वितीय आवृत्तीकरिता उद्युक्त केले त्या बंधु-भगिनींची मी सदैव ऋणी आहे.

थोडक्या अवधीत द्वितीय आवृत्ती छापली म्हणून प्रकाशकांची पण ऋणी.

भगवंताच्या ऋणांत राहूनच जनसेवा करण्यांतच आनंद.

म्हणूनच ही आनंद सरिता !

कवयित्री

**श्रीमती आशालता वेलणकर**

मुरलीधर मंदिर, अंबरनाथ ४२१५०१

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | गणेश स्तवन | १ |
| २) | दावी चरण तुझे श्रीहरि | १ |
| ३) | सद्‌गुरु नमन | २ |
| ४) | देई मज आसरा | २ |
| | भजन | २ |
| ५) | हरि मज भाव तुझा कळला | ३ |
| ६) | तुजविण अन्य कोण त्राता | ३ |
| ७) | जगांत वाण नसे सुखाला | ४ |
| ८) | धाव घेई पाव श्रीहरि | ४ |
| ९) | बालमोहन | ५ |
| १०) | दिसोत मज दत्ताची पाऊले | ५ |
| | भजन | ६ |
| ११) | दर्शनाची आस | ६ |
| १२) | ऐलथडी पैलथडी | ६–७ |
| १३) | श्याम सुंदर | ७ |
| १४) | लागो मनाला छंद | ८ |
| १५) | सावध ! सावध !! | ८ |
| १६) | पदरी मज घ्यावी | ९ |
| | भजन | ९ |
| १७) | इकडे तिकडे | १० |
| १८) | सासर | १० |
| | भजन | १० |
| १९) | माहेर | ११ |
| २०) | वासुदेव पांडुरंग | ११ |
| २१) | देहाचं हारपलं भान | १२ |
| २२) | देहगांव | १३ |

| | | |
|---|---|---|
| २३) | पांच संत | १३ |
| २४) | देव कसा ? | १४ |
| २५) | विठ्ठल विठ्ठल गाऊ | १४ |
| २६) | मानस पूजा | १५ |
| २७) | नारदा रहातो नित मी तिथे | १६ |
| २८) | जय जय यदुवीर समर्थ | १६ |
| २९) | लोभ असू दे हाव असू दे | १७ |
| ३०) | मनन सदा करी रे | १७ |
| ३१) | विचार करी अंतरी | १८ |
| ३२) | चला सज्जनगडला चला | १८ |
| ३३) | तोची भगवद्‌रूप होतो | १९ |
| ३४) | दे साथ मला गोपाला | २० |
| ३५) | नमिते तुज आशा | २१ |
| ३६) | प्रभू रूसवा | २१ |
| ३७) | बांगडीवाला कासार | २२ |
| ३८) | वारकरी (भारूड) | २३ |
| ३९) | उमगले कोडे | २३ |
| ४०) | धावत ये रघुराया | २४ |
| ४१) | सुग्रण | २४ |
| ४२) | बहू अर्थी 'पान' | २५ |
| ४३) | 'नाम घेई बा मना' | २५ |
| ४४) | ज्ञानेश्वर माऊली | २६ |
| ४५) | रामकृष्ण हरि गाऊ या | २६ |
| ४६) | प्रतापी कान्हा | २७ |
| ४७) | कृष्णलीला | २८ |
| ४८) | बुक्का अर्पण | २९ |
| ४९) | विठ्ठल | ३० |
| ५०) | चहा घ्या | ३० |

१

## गणेश स्तवन

नमू या गणराया । आपण
नमू या गणराया ॥ध्रु॥

सत्वगुणाचा निधी हा साचा
निर्मितसे माया ॥१॥

चार वाणीची जननी साची
असे जयाची जाया ॥२॥

उभय देवता प्रसन्न असता
पुलकित आशा काया ॥३॥

२

## दावी चरण तुझे श्रीहरि

दावी चरण तुझे श्रीहरि
ओढ मनीची हीच मुरारी ॥ध्रु॥

जीवा शीवाची ताटातुटी
जरी जाहली व्हावी भेटी
मार्ग दावी सत्वरी ॥१॥

साधन करिता रमते जे मन
का करीना सतत चिंतन
तूचि तया आवरी ॥२॥

सद्‌गुरु कृपा तुझीच छाया
आशा म्हणे कशी जाईल वाया
आले तुझिया दारी ॥३॥

## ३ सद्गुरु नमन

सद्गुरुराया नमिते पाया । कीर्तन रंगी या
कृपेची मिळू दे मज छाया ॥ध्रु॥
बोधाची वचने ही ऐकून
मनन सूत्रामध्ये गुंफून
मौत्तिक माला कंठी घालुनी । सारीन दुरी माया ॥१॥
प्रपंच लटका माया लटकी
क्रोध लोभ हा वाजवी चुटकी
तोडुनी त्यांचे पाश सर्वही । झिजवीन मी काया ॥२॥
इंद्रिय पुष्पे करी घेवोनी
वाहीन गुरु भागिरथीचरणी
आशा म्हणे मम जीवनातील । क्षण न जावा वाया ॥३॥

## ४ देई मज आसरा

देई मज आसरा । प्रभूवरा । देई मज आसरा
शरण मी, लीन मी, पावगा तू त्वरा
देई मज आसरा ॥ध्रु॥
घालोनी जन्मास । पोशियले तूचि खास
संहारी कामास, रागास, द्वेषास
ज्यायोगे इच्छिन सत्संग वारा ऽऽ । देई······ ॥१॥
जिकीन आसनास । चंचल या मनास
आवरीन क्रोधास, लोभास, मोहास
आशा मनी पावेल आनंद खरा ऽऽ । देई······ ॥२॥

## भजन

तुच माय तूच बाप तूच बंधू तू
तूच सखा तूच गुरु तूच विश्व तू
तूच पुरुष तूच शक्ती तूच गुण तू
तूच अखिल जगत मीही तूच तूच तू ॥

५

## हरि मज भाव तुझा कळला

हरि मज भाव तुझा कळला ॥ध्रु॥

दीनोद्धारक म्हणती तुजला

भक्त जवळ आणिला ॥१॥

बहुविध रुपे बहुविध नामे

जगती येऊन राहिला ॥२॥

भक्तिरसाने आळविता तुज

देहभान विसरला ॥३॥

आशेला परी जवळ न करिशी

अपराध काय केला ॥४॥

६

## तुजविण अन्य कोण त्राता

तुजविण अन्य कोण त्राता । भगवंता ऽऽ

तुजविण अन्य कोण त्राता ॥ध्रु॥

तूचि अमुचा पिता बंधू

तूचि अमुचा प्रिय संबंधू

प्रसंगी कोण दुजा सोडविता । भगवंता ऽऽ ॥१॥

सर्वश्रेष्ठ तुझी कालसत्ता

हताश करिते मायिक वित्ता

अभय ओपिशी शरणागता । भगवंता ऽऽ ॥२॥

सत् संगाने श्रवण घडता

अनुसंधानहि सहज साधता

आशा अनुभवी नित्य तृप्तता । भगवंता ऽऽ ॥३॥

७

## जगांत वाण नसे सुखाला

जगांत वाण नसे सुखाला ॥ध्रु॥

हेतू धरोनी करिता कर्म
मिळेल फळ हा विधीचा धर्म
दूर करू मोहाला । जगांत वाण··· ॥१॥

कर्मारंभी प्रभूला स्मरता
फळ कृष्णार्पण म्हणता म्हणता
दूर करू लोभाला । जगांत वाण··· ॥२॥

निर्मल काम होता नित्य
देव अवतरे जाणा सत्य
जवळ करू प्रेमाला । जगात वाण··· ॥३॥

मोह नी लोभ दूर होता
सद्गुरू कृपा येते हाता
तोष मनी आशेला । जगांत वाण··· ॥४॥

८

## धाव घेई पाव श्रीहरि

धाव घेई पाव श्रीहरि
मुरारी, धाव घेई पाव श्रीहरि ॥ध्रु॥

अहंकार हा छेदितो पंख
विवेक वृत्ती बावरी । मुरारी, धाव··· ॥१॥

माया डोही लोभ भोवरा
फिरवितो मज गरगरा । मुरारी, धावा··· ॥२॥

आशा म्हणे प्रभू पदी लीन झाले
अभय देई झडकरी । मुरारी, धाव··· ॥३॥

## ९

# बालमोहन

बाल मोहन कमल नयन

मुखवी मम जी ऽऽ बा ऽऽ ॥धृ॥

नाम तुझे बहू गोड

जीवासी लावी वेड

तेची घ्यावे तेची द्यावे । हीच खरी मेवा ॥१॥

आळस हा नाम वैरी

नामासी विरोध करी

अभय हस्त असता शिरी ।

नको अन्य मेवा ऽऽ ॥२॥

भाव पुष्प नित्य नवे

अर्पिन तुज हेचि हवे

आशा म्हणे जीविताचा

हाचि खरा ठेवा ऽऽ ॥३॥

## १०

# दिसोत मज दत्ताची पाऊले

दिसोत मज दत्ताची पाऊले ३ ॥धृ॥

कृष्णा तिरी औदुंबरी

परब्रह्म अवतरले ऽऽ ॥१॥

गाणगापुरी चंदन पेटीत

गुरुराज विसावले ऽऽ ॥२॥

वाडी गावी जाळीमध्ये

स्वामी स्थिरावले ऽऽ ॥३॥

आशा मनीचे भाव तरळले

नत मस्तक झाले ऽऽ ॥४॥

## भजन

धन्य अनसूया सुत । नाव त्याचे अवधून
ब्रह्मा विष्णू महेश तीन
देव आले बाळ होऊन

११

## दर्शनाची आस

तुज आळवू किती मी घन:श्यामा
मज दर्शन देना श्रीरामा ॥ध्रु॥
नको धनाचा अपूर्व ठेवा
इंद्र पदाचा नच मज हेवा
आस एकची करीन सेवा । संत समागम नित व्हावा ॥१॥
वृक्ष बनोनी पुष्पे देईन
माला होवोनी तुज शोभवीन
एकचि जलबिंदू मी होईन । घालीन स्नाना श्रीरामा ॥२॥
मनास माझ्या कशी आवरु
वृत्ती बावऱ्या कशी सावरु
नाम तुझे हे म्हणती तारु । दे आशेला पूर्ण कामा ॥३॥

१२

## ऐलथडी पैलथडी

मज ऐलथडी ना पैलथडी
बा येई माधवा घेई उडी
मज ऐलथडी ना पैलथडी
संसारी फसगत घडी घडी ॥ध्रु॥

विचार वादळ उठते शमते

पाखरु मन हे भिरभिरते ॥१॥

भव सागरी या क्रोध उसळतो

विवेक नौका बुडवितो ॥२॥

आवर क्रोधा घालू मी कशी

आशा तव रे झाली पिशी ॥३॥

93

## श्यामसुंदर

श्याम सुंदर मधूर वचन। ऐकवी तव तनयाऽऽ ॥ध्रु॥

माया नदी दुथडी वाहे

तरता जीव सभोती पाहे

लोभस वृत्ती फळकुट हाती। श्रम गेले वायाऽऽऽ ॥१॥

चढू जाता संकट गिरी

जीव घाबरे हा वरीवरी

दुस्तर किती कडे कपारी। आवर तव मायाऽऽऽ ॥२॥

मोह नगरी सुंदर परी

क्रोध असे पहारेकरी

हातावरी देऊनी तुरी। आले तव पायाऽऽ ॥३॥

मदमत्सर शत्रू असे

टाकिती नव नव फासे

परी आशा विश्वासे। देई तव छायाऽऽ ॥४॥

## १४
# लागो मनाला छंद

लागो मनाला छंद । जेणे गाईन नित गोविंद ॥ध्रु॥
घेईन नाम मनात येते
कुठे कशी माशी शिकते
घालू कशी पायबंद । जेणे गाईन नित गोविंद ॥१॥
हाती काम मुखात नाम
पावन व्हावे, सकलही धाम
मिळवू कशी स्वानंद । जेणे गाईन नित गोविंद ॥२॥
गुरु बोधाचा रवि उगवता
हृदय कमल हे पूर्ण उमलता
आशा सेवी मकरंद । जेणे गाईन नित गोविंद ॥३॥

## १५ सावध ! सावध !

मना सावध सावध
असता बेसावध होईल रे वध ॥ध्रु॥
पापाची वासना । भोगवील यातना
नको योनी नाना । सावध सावध ॥१॥
सत्य वाट धरी । जीवाला उद्धरी
नको येरझारी । सावध सावध ॥
लागता रे चटक विषयी हो अटक
नको कल्पना भटक । सावध सावध ॥३॥
काम क्रोध लोभ । वाढविती क्षोभ
नरदेह दुर्लभ । सावध सावध ॥४॥
सद्गुरुंचा बोध । आशा हो सावध
प्रपंची नाबाध । सावध सावध ॥५॥

१६

# पदरी मज घ्यावी

मी दीन पदरी मज घ्यावी
गुरुराज स्फूर्ती ही मज घ्यावी ॥ध्रु॥

हृदय आपुले मधु पोवळे
वाटते गुंजी घालावी ॥१॥

बोध वचन तव अमृत बिंदू
वाटते गोडी चारवावी ॥२॥

शरण आलीया मरण भय नसे
वाटते मुक्ती साधावी ॥३॥

आशा मनीची हीच विनवणी
वाटते शांती लाभावी ॥४॥

# भजन

सद्‌गुरु नाथ माझे आई
मजला ठाव द्यावा पायी

आळंदीचे ज्ञानाई । मजला ठाव ......१
पैठणपूरचे नाथाई । मजला ठाव ......२
देहू गांवचे तुकाई । मजला ठाव ......३
सज्जनगडचे दासाई । मजला ठाव......४

## १७ इकडे तिकडे

इकडे प्रपंच प्रपंच। तिकडे परमार्थी आच
इकडे मायेचे बंधन। तिकडे ब्रह्माचे संधान
इकडे मायबाप भाऊ। तिकडे सद्‌गुरु पद पाहू
इकडे चाहती गणगोत। तिकडे मिळती साधुसंत
इकडे सहा शत्रू भारी। तिकडे शांती कैवारी
इकडे अहंकार वाढे। तिकडे विनय सदा पुढे
इकडे देह मीच म्हणती। तिकडे स्वरुपी मग्न होती
इकडे सुख दुःख पहाती। तिकडे उभया मूठमाती
आशा म्हणे प्रपंच जाण। परमार्थासी कारण

## १८ सासर

क्रोध द्वेष दीर धाकुटेचि दोन
नणंद एक लहान वासना ती ॥
अहंकारी वृत्ति सासू पहारा करी
खटाटोप भारी सदोदित ॥
लोभ हा सासरा म्हणे त्वरा करा
शांति भक्ति धरा लूट करा ॥
कुमार्ग वृत्ति ही जाऊ एक वरीष्ट
मोह दीर ज्येष्ठ पति तिचा ॥
अशा सुऱ्या माजी परब्रह्म खेळे
आशा तळमळे भेटीलागी ॥

## भजन

भगवंत सखा व्हावा तरी
भाव हा हवा
हवा हवा हवा हवा
निश्चय हवा ॥

## १९ माहेर

माहेर सुखाचे अति आनंदाचे
भरते प्रेमाचे येई तेथे ।।
शांती भक्ती दोघी बहिणी प्रेमळ
सुख हो तत्काळ सवे त्यांच्या ।।
लाडका एकला सद्भाव बंधू हा
पाठ राखी पहा सदोदित ।।
करी उत्तम पालन गुणी पिता मम
सत्संग हे नाम बहू गोड ।।
सद्गुरु माऊली प्रेमाची साऊली
सर्वस्व देऊन पुरवी कोड ।।
आशा म्हणे माहेरी खेळत रहावे
ब्रह्मरुप व्हावे गुरूकृपे ।।

## २० वासुदेव पांडुरंग

वासुदेव पांडुरंग । स्मरा सदैव श्रीरंग
वासुदेव पांडुरंग ।।ध्रु ।।
नाम घेता नित्य वाचे
सार्थक हो जीवनाचे
मागे पुढे सदा नाचे । सत्य वचन संताचे ।।१।।
लोभ मोह अमुचे अरी (शत्रू)
अहंकार नाश करी
काळ आम्हा नेतो दूरी । परी तारी श्रीमुरारी ।।२।।
वाया गेले गुंतुनिया
जाळे पसरवी माया
सेवेसाठी झिजवीन काया । आशा वंदिते पाया ।।३।।

## २१

# देहाचं हारपलं भान

यशोदेच्या अंगणी, कान्हा खेळे रंगणी
राम कृष्णाची जोडी किती छान
पाहून देहाचं हारपलं भान ॥ध्रु॥

गोकुळात अवतरले शेष नारायण
शेष नारायण
नंद सदनी आनंदाची खाण
पाहून देहाचं हारपलं भान ॥१॥

गवळीयांच्या संगे जाई गाई घेवोनी
वनी गाई घेवोनी
नष्ट केले असूर जीवन
पाहून देहाचं हारपलं भान ॥२॥

यमुना डोही केले ज्याने कालीया मर्दन
हो कालिया मर्दन
चुटकी सरशी गिळीयेला अग्न
पाहून देहाचं हारपलं भान ॥३॥

मथुरेला जाता गोपी गाती गोड गान
गाती गोड गान
मुरलीनादे मोहियले जन
पाहून देहाचं हारपलं भान ॥४॥

धुंद केले गोकुळाला मूर्ती जरी सान
हो मूर्ती जरी सान
आशा गाई त्याचे गुणगान
पाहून देहाचं हारपलं भान ॥५॥

## २२ देहगांव

बाबा सांभाळ जीवा अपुला देहगांव ॥ध्रु॥

शीतोदके स्नान करिता येई पडसे
पडशाच्या लगोलग खोकला असे ॥१॥

अंब्याचिया सुगीमध्ये माशांचा सुकाळ
माशा पाठोपाठ येई पटकी कर्दनकाळ ॥२॥

इवल्याशा सोंडेने हा चावितो डास
हिवताप देहगावी येई हमखास ॥३॥

पोट लागे पाठीला अन् व्यसनी बुडता
क्षय झाला वैद्य म्हणे उपाय न आता ॥४॥

प्लेग नारु खरुज नी नायटा पहा
चारी वाटा रोखुनी देती त्रास किती हा ॥५॥

केली तीर्थे यात्रा आलो रोग घेवोनी
भाव भक्ती नाही देव भेटेल कोठोनी ॥६॥

देहातीत म्हणवीसी राहून देही ना
मोहपाशी गुंतवून आम्हा सोडून जाशी ना ॥७॥

आशा म्हणे कळो आले देह कोणाचा ?
सद्गुरुकृपे मोह मिटला जीव भावाचा ॥८॥

## २३ पांच संत

रामकृष्ण हरि जय जय रामकृष्ण हरि ॥ध्रु॥

धन्य ज्ञानदेव । सांगे गोड ज्ञानेश्वरी ॥१॥

धन्य नामदेव । नाम संकीर्तन करी ॥२॥

धन्य तुकाराम । नाम अखंड उच्चारी ॥३॥

धन्य एकनाथ । देव कावडी भरी ॥४॥

धन्य रामदास । जगा सावध करी ॥५॥

धन्य सद्गुरु । आशा चिंतन करी ॥६॥

## २४ देव कसा?

देव नाही सोहळा अन् देव नाही ओवळा
त्याहुनी तो आगळा ॥
देव नाही ह्या इथे अन् देव नाही त्या तिथे
देव जेथीच्या तिथे ॥
देव नाही सावळा अन् देव नाही ढवळा
रंग त्याचा आगळा ॥
देव नाही आकारी अन् देव नाही विकारी
भाव भक्ती स्विकारी ॥
देव नाही ब्राह्मणांचा देव नाही अंत्यजांचा
प्रेम देईल तो तयाचा ॥
आशा म्हणे हेचि देही नित्य करिता भक्तिही
देव प्रगटे हृदयी ॥

## २५ विठ्ठल विठ्ठल गाऊ

विठ्ठल विठ्ठल गाऊ, विठ्ठल विठ्ठल गाऊ
विठ्ठल विठ्ठल गाता गाता । चिन्मय मूर्ती पाहू ॥ध्रु॥
विठ्ठल मूर्ती छान
पहाता हरपे भान
देहभान गेलियावरी । लागे विठ्ठल ध्यान ॥१॥
विठ्ठल माझा सखा
आहे पाठीराखा
अनुभव हाचि निका । देईल परम सुखा ॥२॥
विठ्ठल नामी प्रीती
मनास मिळते शांती
सद्गुरु कृपे येई प्रचिती । आशा पुलकित चित्ती ॥३॥

## २८ मानस पूजा

मंदिरी तव आले तोषले
मन माझे हे शांत जाहले ऽऽ ॥ध्रु॥
इच्छा मम की पूजा करावी
आले द्वारी निजरुप दावी
नयन द्वय हे बघ आतुरले ऽऽ । मंदिरी··· ॥१॥
सद्वासनेच्या झारीमाजी
जल आणियले स्नानाकाजी
कोमल अंगा बघ न्हाणीयले ऽऽ । मंदिरी··· ॥२॥
नाम अखंडित नेस पितांबर
भजन शेला देते अंगावर
हृदय संपुटी तुज ठेवियले ऽऽ । मंदिरी··· ॥३॥
सत्संगतीच्या सहाणेवरी
प्रयत्न खोड घासुनिया करी
गंध प्रभू तुज बघ लावीयले ऽऽ। मंदिरी··· ॥४॥
भाव मनीचे फुले सुगंधित
गोळा केली प्रपंच बागेत
माला घालुनी तुज शोभविले ऽऽ। मंदिरी··· ॥५॥
सत्कर्माची फळे मधुर ही
अर्पण करीते प्रभूतुज पाही
तव पदी आशा। मन लीन झाले ऽऽ। मंदिरी··· ॥६॥

## २७ नारदा रहातो नित मी तिथे

भाव सुमने भक्तितंतुत गुंफिती भक्त जिथे
नारदा रहातो नित मी तिथे ॥ध्रु॥
मीराबाई सम निर्धर गायन
सखुबाई सम अर्पुनी तनमन
प्रेम गंगेचा झरा झुळझुळ
वहात असतो जिथे । नारदा··· ॥१॥
शिवबाचे परी नर केसरी
रामदासापरी गुरु निर्धारी
शोधूनी पाहता जोडीस नाही
तोड जगात जिथे । नारदा··· ॥२॥
भक्ती गंगेचा पूर लोटता
जगी नांदेल समता एकता
आशा म्हणे मग वैर न राहील
औषधाला जिथे । नारदा··· ॥३॥

## २८ जय जय यदुवीर समर्थ

नामाचा असू दे स्वार्थ । जय जय यदुवीर समर्थ ॥
साधनेने साधू परमार्थ । जय जय यदुवीर समर्थ ॥
धन वेचू परकार्यार्थ । जय जय यदुवीर समर्थ ॥
सत्‌श्रवणे जाणू जीवनार्थ । जय जय यदुवीर समर्थ ॥
समजोनी घेऊ शास्त्रार्थ । जय जय यदुवीर समर्थ ॥
बहु निद्रा आळस व्यर्थ । जय जय यदुवीर समर्थ ॥
नीतिने मिळवू अर्थ । जय जय यदुवीर समर्थ ॥
गुरु कृपा दावी शद्वार्थ । जय जय यदुवीर समर्थ ॥
आशा म्हणे करू या शर्थ । जय जय यदुवीर समर्थ ॥

## २९

# लोभ असू दे हाव असू दे

लोभ असू दे हाव असू दे
नामातचि चित्त मम नित्य रमू दे ॥ध्रु॥

क्रोध असू दे काम असू दे
अखंडित नाम हेच काम बनू दे ॥१॥

मोह असू दे मद असू दे
नाम मदे मोहून पदी लीन होऊ दे ॥२॥

मत्सर असू दे वैर असू दे
दुर्गुणासी सतत लढत जय मिळू दे ॥३॥

संत संग दे आशिर्वच दे
आशा वदे प्रभू मजला प्रचिती येऊ दे ॥४॥

## ३०

# मनन सदा करी रे

मनन सदा करी रे मानवा
मनन सदा करी रे ॥ध्रु॥

श्रवण करावे वेद विचार
ज्ञान तेज पसरे । मानवा ॥१॥

करिता चिंतन गुरु बोधाचे
कुविचार दूर सरे । मानवा ॥२॥

प्रभू चरणाच्या निदिध्यासाने
सुखालयी वसरे । मानवा ॥३॥

तुझा तूची मग ईश बनोनी
स्वानंदी रम रे मानवा ॥४॥

गुरु माऊलीच्या कृपामृताने
आशा न्हाली रे । मानवा ॥५॥

## ३१

# विचार करी अंतरी

मना तू विचार करी अंतरी ॥ध्रु॥
हिंड हिंड तू हिंडलास जरी
आठवला का हरि ? ॥१॥
सुख हवे का लाभ हवा तुज
काय बरे हितकारी ? ॥२॥
कितीक फिरशील शीण का नये
बोध घेई गुणकारी ॥३॥
आशा म्हणे तुज कोण सोडवील
नामी प्रीती धरी ॥४॥

## ३२

# चला सज्जनगडला चला

चला जाऊ चला सज्जनगडला
सज्जनगडला, सज्जनगडला
तिथे भेटू श्री रामरायालाऽऽ ॥ध्रु॥
अंग्लाईचे करु दर्शन । रामरायाला वाहू फूलपान
मारुतीचा अंश, ठोसरांचा वंश
रचियेले श्री दासबोधालाऽऽ ॥१॥
मनोबोधाचे करु वाचन । आत्माराम घेऊ समजून
तेरा कोटी जप, तीर्थ यात्रा खूप
साह्य केले श्री शिवरायालाऽऽ ॥२॥
समर्थांची गोड शिकवण । अंतरंगी करु साठवण
विचारांचे धन, महंताचा मान
सेवा घडावी नित आशेलाऽऽ ॥३॥

३३

# तोची भगवद्रूप होतो

अनन्यभावे भगवंताला शरण जो जातो
तोची भगवद्रूप होतो ॥ध्रु॥

श्रवण करावे परिक्षीतीसम
कीर्तन सेवा नारदासम
श्रवणे कीर्तने पावन होता । भक्तीमध्ये रंगतो ॥१॥

प्रल्हाद करी विष्णुस्मरण
देवी लक्ष्मी पादसेवन
त्यांच्या परि जो होऊनी लीन । देहभान विसरतो ॥२॥

अर्चन क्रीया पृथुराजाकरी
वंदन भक्ती अक्रूरापरी
पूजा वंदन घडता नित्य । आनंदे नाचतो ॥३॥

हनुमंताची दास्यभक्ती
सख्य हरीचे अर्जुन शक्ती
लीन होता चरणी ज्याचा । द्वैत भाव गळतो ॥४॥

भक्ती नववी आत्मनिवेदन
रुक्मिणीने अर्पिले जीवन
सर्मपितता हीच खरी खूण । आत्मसात करतो ॥५॥

नवरंगाची नवविध भक्ती
सद्गुरु कृपा देते शक्ती
आशा म्हणे नित मिळता शांती । अंतर्मुख बनतो ॥६॥

३४

# दे साथ मला गोपाला

साथ मला साथ मला
दे साथ मला गोपाला
गोपाला साथ मला गोपाला ॥ध्रु॥

जगताच्या बाजारी फिरता
फसगत होते येता जाता
जीव बेजार माझा जाहला । जाहला ।
बेजार माझा जाहला ॥१॥

लोभ नी मोह हा लोटीतो पुढती
कैशी खेचू त्यांना मागुती
कसा आवर घालू त्याजला । त्याजला ।
आवर घालू त्याजला ॥२॥

मन माझे म्हणते मी पाहीन
गुण गोविंदी जाईन रंगून
परी विषय खेचितो मला । गोपाला ।
विषय खेचितो मला ॥३॥

आस एकली मनात वसली
पाहीन सुंदर मूर्ती सावळी
वाटे अधिरता आशेला । आशेला ।
अधिरता आशेला ॥४॥

## ३५
# नमिते तुज आशा

नमिते तुज आशा । रामा, नमिते तुज आशा
चुकवी मोहपाशा । रामा, नमिते तुज आशा ॥ध्रु॥

भक्तिरसाचा अपूर्व ठेवा । अर्पण करिते तवचरणी या
करूनी नामघोषा । अखंडित
करूनी नामघोषा । रामा''' ॥१॥

मम शरीराचे हृदय फूल हे । पद कमली या वघ अर्पियले
लागलीसे तृषा । कृपेची
लागलीसे तृषा । रामा''' ॥२॥

अपूर्व तुझे रुप सुनीळा । भरती येवो तव प्रेमाला
पुरवीत जा तू यशा । निशिदिनी
पुरवीत जा तू यशा । रामा''' ॥३॥

## ३६
# प्रभू रूसवा

प्रभू का रे असा रूसवा केला विचार मनाला ?
गाऊ मी कशी पाहू मी कशी बन्सरीवाला ॥ध्रु॥

हे नाम तुझे झोळी करी घाली भिक्षेला, घाली भिक्षेला
देईन मी घास खास बंधू जनाला, बंधू जनाला ॥१॥

भजन तुझे पुष्प करी घेऊनी आले, घेऊनी आले
पूजीन तुज मधुसूदना अधिर जहाले, अधिर जहाले ॥२॥

जनसेवा हीच पूजा आवड तुला, आवड तुला
शरण आले संधी देई दीन आशेला, दीन आशेला ॥३॥

## ३७

# बांगडीवाला कासार

दारी आला कासार हाकारीत दारी आला कासार
ए बांगडी बिल्लोऽऽर हाकारीत दारी आला कासार ॥ध्रु॥

शांती भक्तीचा पाटली जोड
विवेक तोडीस तोड । हाकारीत··· ॥१॥

सुखदु:खाची नागमोड
कल्पना वर्ख अजोड । हाकारीत··· ॥२॥

मी तू पणाची पीळ बांगडी
अनुसंधानी विजोड । हाकारीत ॥३॥

त्रिगुण रेशमी बांगडी साधी
श्रद्धेला रोधी । हाकारीत··· ॥४॥

नवविध भक्ती नव रंगाची
आवड ही हरीची । हाकारीत··· ॥५॥

अज्ञानाची टिचकी बांगडी
वाढवुनी भरितो जोड । हाकारीत ॥६॥

देता हाती हात तयाच्या
पुरवील प्रभूजी कोड । हाकारीत··· ॥७॥

वेडी आशा म्हणे भगिनींनो
हाती भरा ग चुडे । हाकारीत··· ॥८॥

३८

## वारकरी (भारूड)

आले वारकरी वारकरी पंढरीचे वारकरी
हो विठ्ठलाचे वारकरी ॥धृ॥
खांद्यावरी पताका भगवी
वृत्ती त्यागाची दावी ॥१॥
हाती टाळ ठेका धरती
राम कृष्ण हरि वाचे वदती ॥२॥
वारकरी एक वार करी
द्वैत घालविले दूरी ॥३॥
एक वार तरी वारी करी
सोडी जरा नित्य चाकोरी ॥४॥
भक्त भगवंत द्वैत ना उरी
आशा म्हणे चला जाऊ माहेरी ॥५॥

३९

## उमगले कोडे

उमगले कोडे मजला उमगले कोडे ॥धृ॥
अर्थ न कळला जीविताचा मुळी
मन धावे चहुकडे । परी अजी ॥१॥
शोधीत होते ब्रह्म जनी वनी
ते तर हृदयी दडे । साचची ॥२॥
केली आटाआटी व्यर्थची शिणले
सुख न कुठे सापडे । सभोवती ॥३॥
नामची घेता एक तत्वता
फुटले भ्रम बुडबुडे । आशा मनी ॥४॥

## ४०
# धावत ये रघुराया

हे श्रीराऽऽमा। धावत ये रघुराया। राऽऽया
धावत ये रघुराया
चापधर मेघश्यामा, रामा। मोहना रघुराया राया
धावत ये रघुराया ।।ध्रु॥
अयोध्येच्या कमलनयना। आस मनी मी पाहीन वदना
धावत ये रघुराया ।।१।।
बोरे चाखी शबरीची। करीन पूजा मी तव चरणाची
धावत ये रघुराया ।।२।।
दूर सारी मोहपाशा। विनती करिते चरणी आशा
धावत ये रघुराया ।।३।।

# ४१ सुग्रण

बाई मी सुग्रण बाई मी सुग्रण
सुग्रण कशी ती सांगते, सुग्रण कशी ती सांगते ।।ध्रु॥
भात तीन ताळी हिरवी पोळी
मिरच्याची चटणी पोटात होळी ।।१।।
सासू माझी भामटी म्हणत केली आमटी
वाटीच्या बुडाशी डाळीची दाटी ।।२।।
ज्वारीची भाकरी जशी काही खापरी
खाता खाता होईल बोथरी ।।३।।
चिंचेचं सार केलं मजेदार
भुरका मारताच जीव बेजार ।।४।।
भूक लागली झाली अनावर
आशा वाढी पान सत्वर ।।५।।

## ४२

# बहू अर्थी 'पान'

हिरवेगार नागवेलीचे एकची सान पान
काथ चुन्यासह खाता होतसे रसना लाल छान ॥
शिवालयी जाऊनी वाहिले फूल नी बेलपान
भोजन घालुनी द्यावे ब्राह्मणा धोतराचे पान ॥
डाव हातचा जाईल कैसा हुकमाचे हाती पान
टाकुनी जिंकता येईल वरती होईल ताठ मान
बसली पंगत मधे शोभते जामाताचे पान
तसे न होता निष्फळ होतील सर्व ही मानपान ॥
बाल मुकुंद शयन करितो सान वडाचे पान
मुखी घालीतो पदांगुष्ट ते गोड किती ध्यान ॥
शमेल उष्मा होईल शांती करिता रसऽपान
भोजनोत्तरी बैठकीत ते हवेच पानदान
जाईल भ्रांती मिळेल शांती ग्रंथाचे एकपान
अभ्यासावे नित्य नेमे आशा गाते गान ॥

## ४३

# 'नाम घेई बा मना'

सुप्रभाती थोडे तरी रे । नाम घेई बा मना ॥ध्रु॥
आयुष्य बहू मोलाचे । हित करुनी घेई साचे
भय नको संकटाचे । नाम घेई बा मना ॥१॥
आचार संत दाविती । जीवनी घेई प्रचिती
वाढेल जगती ख्याती । नाम घेई बा मना ॥२॥
निंदू नको नित, वासना शुद्ध करी, जाण सगुणा
लीन आशा गुरुचरणा । नाम घेई बा मना ॥३॥

४४

## ज्ञानेश्वर माऊली

ज्ञानेश्वर माऊली। ज्ञानराज माऊली पावली ॥ध्रु॥

भवसागरी जन खाती गोते
बुडत्याला सावरी आवरी ॥१॥

संसारी या विषय पंकी
रुते तया घे अंकी पहाकी ॥२॥

भागवताची विजय पताका
घेई खांद्यावरी ॥३॥

मंत्र सोपा रामकृष्ण हरि
दुमदुमली पंढरी ॥४॥

माऊली देई कृपा साऊली
आशा स्थिरावली पाऊली ॥५॥

४५

## रामकृष्ण हरि गाऊ या

रांधा, वाढा, उष्टी काढा । यातच जीवन कशास दौडा
विठू विटेवरी पाहू या
रामकृष्ण हरि गाऊ या गाऊ या ।
रामकृष्ण हरि गाऊ या गाऊ या ॥ध्रु॥

विठू आमची आई । विठू आमचा भाई
चला माहेरी जाऊ या । रामकृष्ण हरि गाऊ या ॥१॥

भक्त सखा पुंडलीक । चोखा मेळा नामा एक
संतांच्या भेटीला जाऊ या । रामकृष्ण हरि गाऊ या ॥२॥

संत समागम मोलाचे । मिळेल फळ मग श्रवणाचे
आशा विनवी या ग या । रामकृष्ण हरि गाऊ या ॥३॥

## ४८ प्रतापी कान्हा

नंदा किती प्रतापी कान्हा ।।ध्रु।।

नटून थटून आली पूतना
मांडीवरती बाळ तान्हा
करीत असता स्तनपाना । धाडीयेले यमसदना ।।१।।

शकटामध्ये शकटसूर तो
झोळी मधला कृष्ण जाणतो
पाय झटकुनी शकट मोडतो । अवचित हे झाले ना ।।२।।

तृणावर्त तो वेगी येता
वावटळीचे रूप अवचिता
मानेभोवती कर आवळीता । असूर पडला उताणा ।।३।।

बगळा झाला बकासूर
गिळीले कृष्णा महाचतूर
कंठामध्ये फुगवून शरीर । विभागिले चंचूंना ।।४।।

यमुना पुलनी चरती वासरे
त्यांच्या मध्ये रूप साजिरे
वत्सासूर हा जाणुनी त्वरे । घेई त्याच्या प्राणा ।।५।।

अधासूर तो अजगर झाला
भ्रमचि झाला गोपबाळा
मुखी तयाच्या कृष्ण शिरला । वाचविले गोपांना ।।६।।

कालीय सर्प यमुना जीवनी
राहून करी बहू जीवहानी
फडी फडी वर नाचनाचुनी । पाठविले मूळ स्थाना ।।७।।

प्रलंबासूर गर्दभ रूप
ताडवनीचा जणू तो भूप
बळरामासवे वनी जाऊनी । ठार तया केले ना ।।८।।

बैल नव्हे तो अरिष्टासूर
गोकुळी आला करी उच्चस्वर
धरुनी शिंगा मागे रेटिले पाहू न शके तो कृष्ण ॥९॥
कंसाचा जणू उजवा हात
बनला घोडा केशी दैत्य
मूठ तयाच्या मुखी देऊनी । कासावीस केले ना ॥१०॥
मथुरेमाजी मुष्टीक चाणूर
कंसाचे अती बलाढ्य वीर
रामकृष्णाचा होता प्रहार । यमसदनी गेले ना ? ॥११॥
कंस राजा दुष्ट कपटी
आली पाळी त्याची शेवटी
बालकृष्णाने हाणुनी मूठी । धरणीवर पाडीला ना ? ॥१२॥
बाल लीला किती छान
श्रवण करिता हरपे भान
आशा म्हणे नीत गाता गान । मोहासूर मेला ना ? ॥१३॥

४७

## कृष्णलीला

रामकृष्ण हरि जय जय रामकृष्ण हरि ॥ध्रु॥
मथुरेमाजी जन्म जाहला गोकुळी लीला करी ॥१॥
वस्त्राभरणे भूषीत तनू तरी कांबळी खांद्यावरी ॥२॥
सोळा सहस्त्र नारी तरी बाल ब्रह्मचारी ॥३॥
वसुदेवाचा वासुदेव हा वागे गवळ्यापरी ॥४॥
गोपी संगे रास खेळता बासरी अवधीवरी ॥५॥
सद्‌गुरु कृपे आशा विलोकी रूप मनोहारी ॥६॥

## ४८

# बुक्का अर्पण

चल ये साजणी बुक्का वाहू
प्रेमळ सद्‌गुरुचे पद पाहू ॥ध्रु॥

निष्ठेचे ते शीड उभारुनी
विवेकाचे वारे भरूनी
भवसागर हा तरूनी जाऊ ॥१॥

बोधाचे करी खड्‌ग घेऊनी
अहंपणाची मान छाटुनी
तारीती आम्हा ते पद सेवू ॥२॥

क्षमा शांतीसी घेऊनी हाती
मोक्षाचे पद आम्हा दाविती
ब्रह्मानंदी मग्नची होऊ ॥३॥

मी माझेचा टाकू विचार
तू तुझेचा करू निर्धार
आशा म्हणे प्रचिती घेऊ ॥४॥

## ४९ विठ्ठल

विठ्ठल नामात विठ्ठल मनात
विठ्ठल मननात विठ्ठल रे ऽऽ ॥ दोनदा ॥
विठ्ठल ध्यानात विठ्ठल ध्येयात
विठ्ठल धारणेत विठ्ठल रे ऽऽ ॥ दोनदा ॥
विठ्ठल यागात विठ्ठल योगात
विठ्ठल यमात विठ्ठल रे ऽऽ ॥ दोनदा ॥
विठ्ठल जपात विठ्ठल तपात
विठ्ठल कार्यात विठ्ठल रे ऽऽ ॥ दोनदा ॥
विठ्ठल साधनेत विठ्ठल साध्यात
विठ्ठल साधक विठ्ठल रे ऽऽ ॥ दोनदा ॥
विठ्ठल मुखात विठ्ठल मखात
आशा विठ्ठल गाई रे ऽऽ ॥ दोनदा ॥

मख = यज्ञ

## ५०

## चहा घ्या

चहा घ्याहो बंधू भगिनी । मोक्षपद मिळे ज्याचेनी ॥ध्रु॥
शुद्ध मन हेची पात्र । विवेक पाणी स्वच्छ मात्र
सद्वासना हीच साखर । राग द्वेषासी करी चाकर
प्रेम रूपी गिरनार चहा । जगी मिळवी वाहावा
दया शांती शुद्ध रूप । मिळे गोदुग्ध अमूप
संतोष कप तृप्ती बशी । आहे स्वदेशी खाशी
गाळणे ईश भक्ती । चहा घ्यावा हीच प्रीती
करू नका बोलबाला । हाती देते आशाबाला
चहा घ्या हो बंधू भगिनी । मोक्षपद मिळे ज्याचेनी ॥

# आनंद सरिता

## अभिप्राय

★ आनंद हे परब्रह्माचेच रूप आहे. आनंदाची प्राप्ती म्हणजे परब्रह्माचीच प्राप्ती. आनंद सरिता हे त्याचेच प्रतीक आहे. आनंद सरिता वाचताना काव्याशी एकरुपता होते. कारण काव्ये मनाला ओढ लावणारी आहेत. सद्‌गुरुवरील नितांत श्रद्धा काव्यातून दिसून येते. बरीच काव्ये भावमधूर आहेत. शेवटी श्रम-परिहारक 'चहा' घ्या व मोक्षपद मिळवा असं आक्का सांगतात इकडे तरी साधकांनी लक्ष द्यावेच.

**श्री. ब. उर्फ दादा पसारकर,** अमरावती

★ आनंद सरिता काव्य संग्रह वाचनांत आला. झुळझुळ वाहणाऱ्या सरितेत स्नान करीत असल्याचा आनंद झाला. सर्व काव्यांचा ओघ भक्तीमार्गाकडेच आहे. शद्ब रचनेबरोबर अर्थ माधुर्यही काव्यात आहे. काव्यातील उत्स्फूर्तता मनोवेधक आहे. स्वानुभवाच्या अधिष्ठानावर काव्ये आहेत असा पडताळा येतो. अशाच उत्स्फूर्त कविता जनतेसमोर कवयित्रीकडून याव्यात म्हणून त्यांना दिर्घायू इच्छितो.

**श्री. य. कृ. चिखलीकर,** बुलढाणा

★ काव्ये साध्या सरळ भाषेत असून सहज अर्थ शद्बामागे धावतो आहे. गूढ विचार अगदी सोप्या भाषेत प्रगट झाले आहेत. कविता गेय स्वरूपाची असून आल्हाद देणारी आहे. भजनी मंडळाला उपयुक्त आहे.

* प्रत्येक काव्यात आत्मानुभूती

**सौ. ज्योत्स्ना कुलकर्णी**, कल्याण